# अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

**मा.महानगरपालिका ठराव क्रमांक : ८** **दिनांक : - - २००५**

**<u>प्रस्तावाचा विषय :</u>** अहमदनगर शहर महानगरपालिका क्षेत्रात दिनांक १/७/२००५ ते३१/३/२००६ अखेर ९ महीन्याचे कालावधीसाठी जकात वसुलीकामी " जकात अभिकर्ता " नेमणूक करणेबाबत कार्यालयीन प्रस्ताव.

--**--

**<u>प्रस्तावाचा मजकूर :</u>** मे.शासनाने दिनांक १/५/९९ पासुन तत्कालीन नगरपरिषदेमार्फत वसुल करण्यात येत असलेला जकात कर बंद केला.त्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाकडील अधिसुचना क्रमांक जीईएन १०२०००/१९० / प्र.क्र.- ९ नवि -२४ दिनांक ३० जुन २००३ अन्वये अहमदनगर शहर महानगरपालिका अस्तित्वात आली.

त्यानंतर मा.उपसचिव,महाराष्ट्र शासन यांनी शासन निर्णय क्रमांक २५०३/१५९४ / प्र.क्र.५९/०४ नवि - २६ दिनांक २० एप्रील २००४ व १ जुन २००४ अन्वये कळविले आहे की, " अहमदनगर महानगरपालिका अस्तित्वात आलेली आहे.महानगरपालिकेचे महानगरपालिकेचे संपुर्ण क्षेत्र " अ " वर्ग नगरपालिका गृहीत धरुन जी अनुदाने अनुज्ञेय होतात ती अनुदाने अहमदनगर महानगरपालिकेस दिनांक ३० जुन २००३ पासुन दोन वर्षाचे कालावधीसाठी अनुज्ञेय होतील.

मे शासनाचे वरील निर्णयानुसार महानगरपालिकेस जकातीपोटी मिळणारे अनुदान १ जुलै २००५ पासुन बंद होणार आहे.यास्तव मुंबई प्रातिंक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२७ (२) अ नुसार अहमदनगर शहर महानगरपालिका हद्दीत जकात कराची अंमलबजावणी सुरु करणे आवश्यक आहे.

अहमदनगर शहर महानगरपालिका क्षेत्रात प्रत्यक्षात महानगरपालिका कर्मचा-यामार्फत जकात वसुल करण्यापेक्षा मे.शासन आदेश क्रमांक एम एम ए १०९४ / प्र.क्र.३/९४ / नवि - ३२ दिनांक २८ फेब्रुवारी १९९४ नुसार जकात वसुलीकामी जकात अभिकर्ता नेमणे उचीत होईल.

मे शासनाचे उक्त आदेशानुसार भुतपुर्व नगरपरिषदेने सन १९९९-२००० या वर्षाकरीता जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी मे.शासनाने ठरवुन दिलेल्या नियमावली नुसार किमान देकार रक्कम रुपये १५ कोट ५० लाख निश्चित करुन निविदा मागविल्या होत्या व त्याप्रमाणे विहीत मुदतीत ४ निविदा प्राप्त झाल्या. सदर चार निविदापैकी मे.बेलेश्वर एटंरप्रायजेस ,अहमदनगर यांची रुपये १६,१६,१६,०१६/- ची निविदा सर्वाज जास्त रकमेची मंजुर करण्यात आली.तथापी मे.बेलेश्वर एंटरप्रायजेस ,अहमदनगर यांनी विहीत मुदतीत बँन्क गॅरंटीची रक्कम न भरल्यामुळे त्यांची सदर निविदा रद्य करण्यात आली. व त्याचवेळी महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव यांनी त्यांचे पत्र क्रमांक जीईएन - १०९९ प्र.क्र.७०/९९ नवि - १४ दिनांक २६ मार्च १९९९ अन्वये जकात वसुलीकामी जकात अभिकर्ता न नेमता कर्मचा-याकडून जकात वसुलीचे काम सुरु करावे.नगरपालिकेतील जकात कर रद्य करण्यात येणार असल्याचे शासनाचे विचाराधीन आहे.व त्याप्रमाणे १/५/९९ पासुन जकात कर रद्य करण्यात आला.

त्यानंतर अहमदनगर शहर महानगरपालिका अस्तित्वात आली व मे शासनाचे निर्णयानुसार १ जुलै २००५ पासुन जकात पोटी मिळणारे अनुदान बंद होणार असल्याने दिनांक १ जुलै २००५ पासुन जकात सुरु करुन जकात वसुलीकामी मे.शासनाचे २८ फेब्रुवारी १९९४ चे आदेशानुसार जकात वसुलीकामी जकात अभिकर्ता नेमणुक करणे उचीत होईल.

मे.शासनाचे वरील आदेशानुसार जकात वसुलीचे काम अभिकरण पध्दतीने देतांना पहिल्या वर्षासाठी किमान देकार रक्कम ( मिनिमम ऑफर अमाऊंट ) ची गणना करण्यासाठी त्यांचे तीन वित्तीय वर्षापैकी ज्या वर्षाचे जकातीपासून जास्त उत्पन्न मिळाले असेल ती रक्कम २०% ने वाढवावी व त्यामध्ये जकात वसुलीसाठी झालेल्या आस्थापना खर्चाचे ५० % रक्कम मिळवावी अशा बेरजेनंतर जी रक्कम येईल ती रक्कम किमान देकार रक्कम म्हणून निश्चित करण्यात यावी.

मे.महाराष्ट्र शासनाने जकात कर बंद केल्यापासुन महानगरपालिकेस मे.शासनाकडून जकातीपोटी पुढील प्रमाणे अनुदान प्राप्त झाली आहे.

| अ.न. | वर्ष | अनुदानाची रक्कम |
|---|---|---|
| १ | १९९९-२००० | १२,११,२२,०००/- |
| २ | २०००-२००१ | १३,५४,५९,०००/- |
| ३ | २००१-२००२ | १४,४५,७८,०००/- |
| ४ | २००२-२००३ | १८,३२,७९,०००/- |
| ५ | २००३-२००४ | १७,१०,६०,०००/- |
| ६ | २००४-२००५ (माहे नोव्हे.अखेर ९ महीने प्राप्त झाले ) | १३,६४,४०,०००/- |
| | मासिक | १,५२,७३,१२५X१२= १८,३२,७७,५००/- |

मे शासनाचे उक्त निर्णयानुसार १ जुलै २००५ पासुन ३१ मार्च २००६ अखेर ९ महीन्याचे कालावधीसाठी जकात अभिकर्ता नेमणूक करण्यासाठी पुढीलप्रमाणे किमान देकार ( मिनिमम ऑफर अमाऊंट ) निश्चित करावी लागेल.

<u>किमान देकार रक्कम -</u>

| अ.क्र | तपशिल | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | गेल्या ३ वर्षापैकी (२००२-२००३) मध्ये मिळालेली अनुदानाची रक्कम | १८,३२,७९,०००/- |
| २ | अधिक वरील रकमेच्या २०% वाढ | ३,६६,५५,८००/- |
| ३ | अधिक सन ०४-०५ चे आस्थापना खर्चाची ७०% रक्कम | ५०,००,०००/- |
| ४ | एकूण वार्षीक किमान देकार रक्कम (२००५-०६ ) | २२,४९,३४,८००/- |

| | | |
|---|---|---|
| ५ | वजा माहे एप्रील २००५ ते जुन २००५ या महीन्यात<br>जकातीपोटी प्राप्त होणारे अनुदाना पोटी | ४,५८,१९,३७५/- |
| ६ | म्हणजेच १ जुलै २००५ ते ३१ मार्च २००६ या ९ महीन्याचे कालावधीसाठीची किमान देकार रक्कम | १७,९१,१५,४२५/- |

अशाप्रकारे महानगरपालिका क्षेत्रात आयात होणा-या मालावरील जकात वसुलीकामी जकात अभिकर्ता नेमणेसाठी मे.शासनाचे निर्णयानुसार दिनांक १ जुलै २००५ ते ३१ मार्च २००६ या ९ महीन्याचे कालावधीसाठी रुपये १८,००,००,०००/-
एवढी किमान देकार रकमेस ठेका देणे उचीत होईल.मे.शासन निर्देशानुसार याबाबतचा जाहिर निवेदन मसुदा एक राज्यस्तरीय एक जिल्हा स्तरीय व एक स्थानिक वर्तमान पत्रातून किमान इंग्रजी व मराठी या दोन भाषेमधून प्रसिध्द करणे आवश्यक आहे.

तरी अहमदनगर शहर महानगरपालिका हद्यीत दिनांक १ जुलै २००५ ते ३१ मार्च २००६ या ९ महीन्याचे कालावधीसाठी किमान देकार रक्कम रुपये १८,००,००,०००/- ( १८ कोट ) एवढया रकमेस जकात वसुलीकामी जकात अभिकर्ता नेमणूक करणेस मंजूरी मिळावी.ही विनंती.

यावर मा.उपायुक्त ( सा.) यांचा अभिप्राय की,नगरसचिव यांनी सादर केलेला अहवाल स्वयंस्पष्ट आहे. अभिकर्ता नेमणुकीमुळे अपेक्षित २० % उत्पन्नवाढ महानगरपालिकेला मिळणांर असुन जकात आस्थापनेवरील कर्मचारीवर्गही अन्य विभागांसाठी उपलब्ध होणांर आहे. त्यामुळे अभिकर्ता नेमुन जकात वसुली करणें उचित वाटते.आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,उपरोक्त प्रस्तावाचे अवलोकन केले. प्रस्तावित किमान देकार तत्कालीन नगरपालिका क्षेत्रातील जकात उत्पन्न आणि महानगरपालिकेस शासनांकडुन जकातीपोटी मिळालेले अनुदान यावर आधारित आहे. नगरपालिका / महानगरपालिकेचे हद्यवाढीत जे क्षेत्र वाढले त्या क्षेत्रातील जकात उत्पन्नाचे क्षमतेचा , साधनांचा घटकांचा विचार होणें क्रमप्राप्त आहे. तरी अशा बाबींचा अभ्यास करुन किमान देकार बाबत फेरप्रस्ताव सादर करा.

यावर मा.नगरसचिव यांचा फेरसादर रिपोर्ट की, दि.१ जुलै २००५ ते ३१ मार्च २००६ या ९ महिन्याचे कालावधीसाठी जकात वसुलीसाठी अभिकर्ता नेमणूक करावयाची झाल्यास मे.शासनाचे मार्गदर्शक तत्वानुसार किमान देकार रक्कम रुपये १८ कोटी निश्चित होते. परंतु दि.३० जुन २००३ पासून भुतपूर्व नगरपरिषदेचे महानगरपालिकेत रुपांतर होऊन जिल्हा परिषद क्षेत्रातील केडगांव, बुरुडगांव, नागापुर, फकीरवाडा, दर्गादायरा, माळीवाडा, चाहुराणा खुर्द, बुद्रुक, मोरचुदनगर, नालेगांव, बोल्हेगांव, सावेडी, भिस्तबाग या गावांचा महानगरपालिका हद्दीत समावेश झाला. त्यामुळे महानगरपालिकेची हद्दवाढ होऊन पूर्वीचे १८२९ हेक्टर क्षेत्र आता ८३२१.३४ हेक्टर झाले आहे. त्याचप्रमाणे लोकसंख्येत खालीलप्रमाणे वाढ झाली आहे.

जनगणनेनुसार लोकसंख्येचा तपशिल

| अ.नं. | लोकसंख्येचे क्षेत्र | सन १९९१ चे जनगणनेनुसार | सन २००१ चे जनगणनेनुसार |
|---|---|---|---|
| १ | सन १९९९ पुर्वी नगरपरिषद हद्दीत समाविष्ट क्षेत्र | १,८१,३३९ | २,०७,४२८ |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | सन १९९९ नंतर समाविष्ट क्षेत्र | ५३,१०२ | १,००,१८७ |
| | एकूण | २,३४,४४१ | ३,०७,६१५ |

नगरपरिषद अस्तित्वात असताना ज्या हद्दीमध्ये जकात वसुली करण्यात येत होती. त्या हद्दीमध्ये वरील १२ गावांचा समावेश नव्हता. त्यामुळे मा.शासनाने दिनांक १-५-९९ रोजी जकात कर रद्द केल्यानंतर अहमदनगर नगरपरिषदेने मा.शासनाकडे जकात अनुदानाची मागणी करताना वरील वाढीव १२ गावाचे क्षेत्रात आवक होणा-या मालाची म्हणजेच त्यावर होणा-या जकातीची रक्कम अनुदानात धरलेली नव्हती. हद्दवाढीत नव्यानेच समाविष्ट झालेल्या जिल्हा परिषद क्षेत्रातील नागरिकांचा व्यापारी दृष्टया संबंध हा मुळ अहमदनगर हद्दीतील बाजारपेठेशीच होता. त्यामुळे हद्दवाढीचा व वाढीव ४८.३०% लोकसंख्या वाढीचा मुद्दा विचारात घेता देकार रकमेत त्या प्रमाणात वाढ करावी लागेल. सबब अशा परिस्थितीत १ जुलै २००५ ते ३१ मार्च २००६ या ९ महिन्याचे कालावधीसाठी जकात ठेक्याची रक्कम निश्चित करताना हद्दवाढ व लोकसंख्या वाढीचा मुद्दा विचारात घेऊन त्याचप्रमाणे महानगरपालिकेचे जकात दराचे मा.शासनाचे अस्तित्वात असलेले शेडयुल विचारात घेता खालीलप्रमाणे देकार रक्कम निश्चित करावी लागेल.

| अ.नं. | तपशिल | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | मागील ३ वर्षातील सर्वात जास्त उत्पन्न | १८,३२,७९,०००/- |
| २ | सन २००१च्या जनगणनेनुसार ४८.३०% लोकसंख्या वाढ विचारात घेऊन अंदाजित होणारे उत्पन्न वाढ | ८,८५,२३,७५७/- |
| ३ | अधिक वरील रकमेच्या २०% वाढ | ५,४३,६०,५५१/- |
| ४ | अधिक सन ०४-०५ चे आस्थापना खर्चाची ५०% रक्कम | ५०,००,०००/- |
| ५ | एकूण वार्षिक किमान देकार रक्कम (२००५-०६) | ३३,११,०३,३०८/- |
| ६ | वजा माहे एप्रिल २००५ ते जुन २००५ या महिन्यात जकातीपोटी प्राप्त होणारे अनुदानापोटी (अ.क्र.५ ची रक्कम विचारात घेता) | ८,२७,९०,८२७/- |
| ७ | म्हणजेच १ जुलै २००५ ते ३१ मार्च २००६ या ९ महिन्याचे कालावधीसाठीची किमान देकार रक्कम | २४,८३,७२,४८१/- |

तरी अहमदनगर शहर महानगरपालिका हद्दीत दि.१ जुलै २००५ ते ३१ मार्च २००६ या ९ महिन्याचे कालावधीसाठी किमान देकार रक्कम रुपये २४,८३,७२,४८१/- एवढया रकमेस जकात वसुलीकामी जकात अभिकर्ता नेमणूक करणेस मंजुरी मिळावी, ही विनंती.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की,वरील अहवालानुसार प्रस्ताव मंजुरीसाठी मा. सर्व - साधारण सभेपुढे ठेवणेंसाठी शिफारस आहे.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त ( सा ) यांचे अभिप्रायासह,मा.आयुक्त साहेब यांचे अभिप्राया सह व मा.नगरसचिव यांचे फेरसादर रिपोर्टासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

मा.महानगरपालिका ठराव क्रमांक : ४ दिनांक : ३१ - ३ - २००५

प्रस्तावाचा विषय : मुकूंदनगर,फकिरवाडा पाणीपुरवठा योजना ८ " पाईपलाईन व १० लाख लिटर क्षमतेची उंच पाण्याची टाकी बांधणें बाबत ऑफिस रिपोर्ट.

--**--

प्रस्तावाचा मजकूर : महानगरपालिकेच्या मुकूंदनगर,फकिरवाडा भागासाठी सध्या वसंत टेकडी पंपिंग स्टेशन येथुन पंपिंग करुन बंदिस्त पी.व्ही.सी.पाईप लाईनद्वारे रोटेशन पध्दतीने पाणी पुरवठा करण्यांत येतो. सदरचा पाणी पुरवठा अपुरा असल्यांने नागरिकांच्या वरचेवर तक्रारी येत असल्यामुळे सदर भागातील नगरसेवक सर्वश्री शेख मुदस्सर अहमद इसहाक,खान समद वहाब,दिघे विमल रामचंद्र,सौ.सुनिता राकेश साहनी यांनी यादी देवुन सदर कामांस ढोबळ अंदाजपत्रक तयार करुन शासनांस योजना मंजुरीसाठी सादर करणेंविषयी सर्वसाधारण सभेमध्ये ठराव करावा म्हणुन विनंती केली.

सदर नगरसेवकांचे यादीनुसार ऑफिस रिपोर्ट मंजुर करुन सदरचा प्रस्ताव दिनांक ३-८-२००४ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यांत आला. सदर प्रस्तावावर सांगोपांग चर्चा होवून ऑफिस रिपोर्टनुसार गिडीऑन इन्फरमेटिक कंपनीकडून सदर कामांबाबत अभिप्राय घेवून अंदाजपत्रके मा.शासनांकडे अनुदान मागणीसाठी पाठविण्यांत यावीत असा महानगरपालिका ठराव क्र.१० दिनांक ३-८-२००४ अन्वये सर्वानुमते पारित झाला.

मा.कक्ष अधिकारी,पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय,मुंबई यांनी त्यांचे पत्र क्रमांक पॅकेज - १८०४ / प्र.क्र./ १८८ / पा.पु.- ९ दिनांक १२-८-२००४ चे पत्रान्वये मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नाशिक यांना सदर योजनेला अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम पॅकेज अंतर्गत मंजुरी देण्यांकरीता शासनांने मान्यता दिलेली आहे. असे कळवुन सदर योजनेचे सविस्तर अंदाजपत्रके व आराखडे तयार करुन शासनास प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करणें बाबत कळविलेले होते.

तदनंतर लगेच कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन,पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय,मुंबई यांनी त्यांचे पत्र क्रमांक पॅकेज १८०४ / प्र.क्र./ १८८ / पा.पु.- ०९ दिनांक १६-८-२००४ अन्वये उपरोक्त विषयावरील मुख्य अभियंता,महा.जीवन प्राधिकरण,नाशिक यांना उद्येशुन लिहीलेले शासनांने दिनांक १२-८-०४ चे पत्र रद्य समजण्यांत यावे, असे महानगरपालिकेस उद्येशुन लिहीलेल्या पत्रात नमुद केलेले आहे.

महाराष्ट्र शासन,पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांचेकडून प्राप्त झालेला वरील पा.पु.योजने संबंधिचा शासन निर्णय क्र.पापुयो १९०४ / स.क्र.३३२ / प्र.क्र.७२ / पा.पु.-१७ मंत्रालय,मुंबई दिनांक १८-८-२००४ अन्वये मुकूंदनगर फकिरवाडा भागासाठी पाणीपुरवठा करण्यांकरीता पा.पु.योजनेच्या अंदाजपत्रकांस प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. ( सोबत शासन निर्णय ) परंतु सदरहू निर्णयात सदरची योजना पुन्हा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांने राबवावी अशा प्रकारचा ठराव

महानगरपालिकेने पारित करुन तो प्राधिकरणांकडे सादर करावा इत्यादी बाबी नमुद केलेल्या असुन या योजनेचा वित्तीय आकृतीबंध खालील प्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| अ | योजनेची निव्वळ ( १७.५ % इ.टी.पी.धरुन ) | रु.१,७३,०३,८६१=०० |
| ब | योजनेची ढोबळ किंमत | रु.२,०३,३२,०३६=०० |
| क | शासकीय अनुदान ( २३.३३ % ) | रु.४७,४३,४६४ =०० |
| ड | १० % लोकवर्गणी | रु.२०,३३,२०४=०० |
| इ | कर्ज ( ६६.६७ % ) | रु.१,३५,५५,३६८ =०० |

सदरच्या शासन निर्णयाप्रमाणे सदरची योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यांचा ठराव महानगरपालिकेने पारित केल्यास म.न.पा.ला सदर योजनेच्या अंदाजपत्रकीय एस्टीमेंट रकमेवर १७.५ % एवढी रक्कम म्हणजेच रुपये ३०,२८,१७५=०० इ.टी.पी.चार्जेस म्हणुन म.जि.प्रा.कडे भरावी लागेल. आणि जर सदर योजना महानगरपालिकेमार्फत राबविल्यास वरील इ.टी.पी.चार्जेसचे खर्चात काटकसर होवुन सदर रक्कमेची बचत होईल.

अधिक्षक अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ,अ.नगर यांचे पत्र क्रमांक ताशा - १ / २३४४ दिनांक १६-८-२००४ चे पत्र दिनांक २१-८-२००४ रोजी इकडेस प्राप्त झालेले असुन सदर पत्रात त्यांनी " उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने संदर्भिय पत्रांच्या प्रती या कार्यालयास प्राप्त झाल्या आहेत. सदर पत्रानुसार विषयांकित योजना नियमित योजना म्हणुन राबविणे आपणांस अपेक्षित असेल तर सदर योजनेचा प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांच्या क्षेत्रिय अधिका-याकडुन मध्यवर्ती कार्यालयामार्फत शासनांस प्रशासकीय मान्यतेसाठी सादर होणें गरजेचे आहे. " असे नमुद केलेले आहे.

तरी नुकतेच प्राप्त झालेल्या मा.शासनाचे निर्णयानुसार सदरची पाणी पुरवठा योजना कशी राबवावी अनुदान कसे प्राप्त करावे.इत्यादी बाबत सदर निर्णयात स्पष्ट उल्लेख केलेला असल्यांने सदर निर्णयाचे अनुषंगाने सदरची योजना महानगरपालिकेमार्फत राबविणें बाबत व त्याप्रमाणे मा.शासनांस पत्र देवुन कळविणेंस्तव आदेशार्थ ऑफिस रिपोर्ट स.सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की,शासन निर्णय क्र.पापुयो १९०४ / स.क्र.३२ / प्र.क्र.७२ / पा.पु.योजना - १७ दि.१९ ऑगष्ट २००४ अन्वये अटींच्या अधिन राहुन प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यातील अट क्र.- १ नुसार योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांमार्फत राबविण्यांत येईल.अट क्र.६ नुसार सदर योजनांचा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांच्या २००३ - २००४ च्या वार्षिक कृती आराखडयात समावेश करण्यांत यावा.अट क्र. ७ नुसार सदर योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांमार्फत राबविण्यांत यावी. व तशा प्रकारचा ठराव अहमदनगर महानगरपालिकेने पारित करुन तो प्राधिकरणांकडे पाठवावा.

योजना म.जी.प्रा.मार्फत करण्यांचा ठराव पारीत केल्यास महानगरपालिकेला योजनेच्या अंदाजपत्रकीय रक्कमेवर १७०५० % ( इ.टी.पी.चार्जेस ) म्हणजेच रक्कम रुपये ३०,२८,१७५=०० योजना राबविण्यांचा खर्च म्हणून द्यावा लागेल.योजना महानगरपालिकेमार्फत

राबविल्यास रुपये ३०,२८,१७५ ची बचत होईल. तरी योजना महानगरपालिकेमार्फत राबविण्यांचा ठराव व अंदाजपत्रक शासनास पुनश्च म.जी.प्रा.च्या क्षेत्रिय अधिका-यामार्फत पाठविणें आवश्यक आहे.

तरी महानगरपालिके मार्फत ठराव पाठविणें बाबत सादर.

यावर मा.उपायुक्त ( सा.) यांचा अभिप्राय की,महानगरपालिकेकडे पाणीपुरवठयासाठी तज्ञ मेकॅनिकल इंजिनिअर असुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणांचे कार्यकारी अभियंता प्रतिनियुक्तीवर शहर अभियंता म्हणुन कार्यरत आहे. प्रथमत ः सर्व्हे व ढोबळ मानाने योजनेचे अंदाजपत्रक महानगरपालिकेमार्फतच करण्यांत आलेले आहे. प्रस्तुत योजनेत तांत्रिकदृष्टया काहीसे कठीण काम केवळ टाकी बांधणेंचे असून उर्वरित काम पाईपलाईन टाकणेंचे आहे.म.जी.प्रा.ने योजना राबवितांना करावयाच्या कामापैकी बहुतेक कामे ( ढोबळ मानाने अंदाजपत्रके तयार करणें,सर्वेक्षण करणें,योजना सादर करुन त्यास सक्षम प्रशासकीय मान्यता प्राप्त करुन घेणें इ.) महानगरपालिकेच्या यंत्रणे मार्फत करणेंत आली आहे. अशा परिस्थितीत योजनेच्या खर्चाच्या १७.५ % रक्कम म्हणजेच रु. ३०,२८,१७५ /- चा महानगरपालिकेवर आर्थिक भुर्दंड लादणे नुकसानकारक आहे. त्यामुळे योजना महानगरपालिके मार्फत राबविण्यांबाबत व वरील कारण मिमांसेसह सविस्तर प्रस्ताव मा.सदस्य सचिव,म.जी.प्रा.व मा.प्रधान सचिव , पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांना पाठविणें बाबत ठराव करणेंसाठी व प्रस्ताव सादर करणेंसाठी शिफारस आहे.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, महानगरपालिका विभागामार्फत तांत्रिक कुशलता उपलब्ध असल्यांने प्रस्तावित काम करणें बाबत ठरावास मान्यता देणेंस हरकत नाही.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट शहर अभियंता यांचे अभिप्रायासह,मा.उपायुक्त ( सा.) यांचे अभिप्रायासह व मा.आयुक्त साहेब यांच्या अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेविला.

-- *--

**ठराव :** मुकंदनगर ते फकिरवाडा पाणी पुरवठा योजना पाईपलाईन टाकणे व उंच टाकी बांधणे या प्रस्तावास पुढील बाबींच्या समावेशासह मान्यता देत आहे.

१.अंदाजपत्रकानुसार व प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे १० % लोक वर्गणी भरणेंस ही सभा मान्यता देत आहे. महानगरपालिकेच्या आर्थिक स्थितीचा विचार करता मा.शासनाने उर्वरित संपूर्ण रक्कम सदरच्या पाणीपुरवठा योजनेकरीता उपलब्ध करुन देणेंस्तव मा.शासनांस विनंती करणेंत यावी.

२.मा.शासन यंत्रणेकडुन सदरचे काम केल्यास सुपरव्हिजन चार्जेस व तदनुषंगिक बाबींचा १७ % वाढीव खर्च अपेक्षित आहे. याकरीता महानगरपालिकेच्या माध्यमांतून सदरचे काम करणेंत यावे.खर्च मंजुर.

ठराव सर्वानुमते मंजुर.

सुचक ः मा.श्री.अनंता जोशी.

अनुमोदक ः मा.श्री.शेख मुदस्सर अहमद इसहाक.

सभेचे महापौर,<br>अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

**मा.महानगरपालिका ठराव क्रमांक : १०** **दिनांक : - - २००५**

---

**<u>प्रस्तावाचा विषय :</u>** अहमदनगर महानगरपालिकेचा दिनांक ३१-३-०४ अखेरचा मत्ता व दायित्व आणि वार्षिक लेखांचा गोषवारा अखेर मा.महासभेपुढे मंजुरीस्तव सादर.

--**--

**<u>प्रस्तावाचा मजकूर :</u>** अहमदनगर महानगरपालिकेचा दिनांक ३१-३-०४ अखेरचा मत्ता व दायित्व आणि वार्षिक लेखांचा गोषवारा मा.स्थायी समिती समोर ठेविला असता त्यावर मा.स्थायी समिती ठराव क्र.३ दि.२९-११-२००४ नुसार ठराव की, '' अहमदनगर महानगरपालिकेचा दिनांक ३१-३-०४ अखेरचा मत्ता व दायित्व आणि वार्षिक लेख्यांचे गोषवा-यास मंजूरी देण्यांत येत आहे.

अखेर मंजुरी साठी मा.महानगरपालिका सभेपुढे ठेवण्यांत यावे.

सदर ठरावास मा.श्री.जाधव कृ.द.,मा.श्री.कोतकर भा.ए.मा.श्री.पवार ना.शां.,मा.श्री.जगताप नि.वि.,मा.श्रीमती.शेख सु.लि.सदस्य,स्थायी समिती यांचा विरोध.

सुचक - मा.श्री.साठे म.द.

अनुमोदक - मा.श्री.चोपडा सं.फु.

ठराव बहुमताने मंजुर.

सबब अहमदनगर महानगरपालिकेचा दिनांक ३१-३-०४ अखेरचा मत्ता व दायित्व आणि वार्षिक लेखांचा गोषवारा मा.स्थायी समितीचे मंजुरीसह मा.महासभेपुढे अखेर मंजुरीस्तव सादर.

# अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

**मा.महानगरपालिका ठराव क्रमांक : ११** **दिनांक : - - २००५**

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिकेचा सन २००३-०४ या आर्थिक वर्षाचा बाबवार जमा खर्चाचा वार्षिक तक्ता ( एप्रिल २००३ मार्च २००४ अखेर ) मंजूरीस व मा.महासभेपुढे अखेर निर्णयास्तव.

--**--

**प्रस्तावाचा मजकूर :** अहमदनगर महानगरपालिकेचा सन २००३-०४ या आर्थिक वर्षाचा बाबवार जमा

खर्चाचा वार्षिक तक्ता ( एप्रिल २००३ मार्च २००४ अखेर ) मा.स्थायी समिती समोर ठेविला असता त्यावर मा.स्थायी समिती ठराव क्र.२ दि.२९-११-२००४ नुसार ठराव की, ''अहमदनगर महानगरपालिकेचा सन २००३-०४ या आर्थिक वर्षाचा बाबवार जमा खर्चाचा वार्षिक तक्ता ( एप्रिल २००३ मार्च २००४ अखेर ) मंजुर करण्यांत येत आहे.

अखेर मंजुरी साठी मा.महानगरपालिका सभेपुढे ठेवण्यांत यावे.

सदर ठरावास मा.श्री.जाधव कृ.द.,मा.श्री.कोतकर भा.ए.मा.श्री.पवार ना.शां.,मा.श्री.जगताप नि.वि.,मा.श्रीमती.शेख सु.लि.सदस्य,स्थायी समिती यांचा विरोध.

सुचक - मा.श्री.बोरा कि.हि.

अनुमोदक - मा.श्री.पाऊलबुध्दे वि.ना.

ठराव बहुमताने मंजुर.

सबब अहमदनगर महानगरपालिकेचा सन २००३-०४ या आर्थिक वर्षाचा बाबवार जमा खर्चाचा वार्षिक तक्ता ( एप्रिल २००३ मार्च २००४ अखेर ) मा.स्थायी समितीचे मंजुरीसह मा.महासभेपुढे अखेर मंजुरीस्तव सादर.